# ज्योतिर्मय


Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १५५ वा ❑ रविवार दि.०३ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


# कृतीतून माणुसकी, एकजुटीचा मंत्र देणारा मार्गदर्शक हरपला-रतन शारदा





कै.सुनील राव खेडकर

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**पुणे** – आपले जीवन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यासाठी सुनीलराव खेडकर यांनी समर्पित केले. त्यांचे संघटन कौशल्य,संवाद कौशल्य आणि प्रत्येक कामाचा पाठपुरावा करण्याची त्यांची वृत्ती ही आपल्या सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. आपल्या कृतीतून माणुसकी आणि संघातून एकजुटीचा मंत्र देणारा मार्गदर्शक हरपला आहे पण त्यांचे समर्पण आपल्याला कार्याची प्रेरणा देते असे मत प्रसिद्ध लेखक डॉ. रतन शारदा यांनी व्यक्त केले.

पुणे महानगराचे माजी प्रचार प्रमुख आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक सुनीलराव खेडकर यांचे नुकतेच पुण्यात निधन झाले. कर्वेनगर येथील कमिन्स कॉलेजच्या सभागृहात आयोजित त्यांच्या श्रद्धांजली सभेप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पुणे महानगर संघचालक रवींद्र वंजारवाडकर, संभाजी भाग संघचालक अनिल व्यास उपस्थित होते.

शारदा पुढे म्हणाले, सुनीलराव यांचे संघटन कौशल्य केवळ माणसांना एकत्र आणण्यापुरते मर्यादित नव्हते, तर ते प्रत्येक व्यक्तीमधील सुप्त क्षमता ओळखून त्यांना योग्य न्याय देण्यासाठी धडपडणारे होते. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्ते घडले. समाजाच्या विविध क्षेत्रांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान त्यांनी दिले.असेही ते म्हणाले. आपल्या पुस्तक निर्मितीत सुनीलराव यांचा मोलाचा वाटा असून 'संघ आणि स्वराज्य' हे पुस्तक त्यांनी यावेळी खेडकर यांना समर्पित करत त्यांच्या कुटुंबियांना दिले.

यावेळी पुणे महानगर चे संघचालक रवींद्र वंजारवाडकर म्हणाले की, सुनीलराव यांचे संवाद कौशल्य इतके प्रभावी होते की, अगदी सामान्य माणसापासून ते मोठ्या पदावरील व्यक्तींपर्यंत सर्वांशी ते सहज संवाद साधू शकत होते. त्यांच्या बोलण्यातून फक्त शब्दच नाही, तर आपुलकी आणि आपलेपणा जाणवत असे. सर्व कामात बारीकसारीक निरीक्षणे, अभ्यास आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीचे नियोजन ते करत असत. पुण्यात विविध ठिकाणी बाल शाखा लागण्यात त्यांचा पुढाकार होता. त्यांच्या एका शब्दावर कोणताही कार्यकर्ता कामाला लागायचा, हे त्यांच्या संवाद कौशल्याचेच यश होते. कोणतेही काम हाती घेतल्यावर ते पूर्णत्वास नेण्याची त्यांची जिद्द वाखाणण्याजोगी होती. कामाचा पाठपुरावा करण्याची त्यांची सवय ही कामात यश मिळवण्याचे एक महत्त्वाचे कारण होते. त्यांच्या प्रत्येक कामात स्पष्टता आणि अचूकता दिसून येत असे. आज जरी ते आपल्यात नसले, तरी त्यांचे कार्य, त्यांचे विचार आणि त्यांनी घालून दिलेली मूल्यांची वाटचाल आपल्याला नेहमीच प्रेरणा देत राहील. असेही ते म्हणाले.

शिस्त, निष्ठा आणि समर्पण हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे तीन भक्कम आधारस्तंभ होते. स्थानिक तसेच प्रांत स्तरावर संघ कार्यामध्ये त्यांनी आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांचे जीवन म्हणजेच सेवा, त्याग व कर्तव्यभावनेचे मूर्तिमंत उदाहरण होते. युवकांचा राष्ट्रनिर्मितीमध्ये सहभाग वाढवण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम राबवले. कुटुंबातील सर्वांचा परिचय करून घेत प्रत्येकाला विविध पद्धतीने संघ कामात कसे आणता येईल यासाठी ते फक्त कार्यकर्ता नाही तर कुटुंबाशी जोडले गेले होते. संघ कामासोबतच आपल्या व्यवसायातील त्यांची शिस्त आणि सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांना त्यांनी 'मित्रा' संबोधून कायम जोडून ठेवले. त्यामुळे सुनीलराव सर्वांना आपले वाटले. असे मत त्यांच्या सोबत काम केलेल्या मित्र, व्यवसायिक, प्रचार विभागातील कार्यकर्ते, कौटुंबिक हितचिंतक यांनी व्यक्त केले. सत्यजित चितळे,सुहास देव, विराज देवडीकर,रुपाली भुसारी,सार्थक शिंदे आदिंनी यावेळी मनोगत व्यक्त केले. राजू चौथाई यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी खेडकर यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

विशेष लेख...

## दगाबाज अमेरिकेपासून भारताला सावध राहण्याची गरज

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

परत एकदा अमेरिकेने पाकिस्तानसोबत हात मिळवणी करत भारताला दूर करण्याचा खेळ खेळला आहे.एकीकडे, अमेरिका भारतासोबतच्या व्यापारावर कठोर भूमिका घेत आहे, तर दुसरीकडे, पाकिस्तानसोबतचे त्यांचे व्यापारी संबंध अधिक मजबूतहोतआहेत. पहलगाममधील भारत–पाकिस्तान संघर्षानंतर, जनरल मुनीर यांनी व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प यांची भेट घेतली.

काही दिवसांनी, पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांचीही भेट घेतली.

दरम्यान,अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष यांनी भारतावर २५ टक्के कर लादत दुसरीकडे पाकिस्तानशी हात मिळवणी केली.ट्रम्प यांनी गुरुवारी (३१ जुलै) सोशल मीडियाद्वारे माहिती दिली की अमेरिका आणि पाकिस्तानमध्ये एक करार झाला आहे. याअंतर्गत, दोन्ही देश तेल साठ्यांच्या विकासावर काम करतील. ट्रम्प यांनी या करारातून भारताला बाजूला केले आहे. त्यांनी दक्षिण कोरियाबाबत एक महत्त्वाची घोषणा देखील केली आहे.

ट्रम्प यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथवर लिहिले की, ''आम्ही पाकिस्तानसोबत एक करार केला आहे, ज्याअंतर्गत पाकिस्तान आणि अमेरिका त्यांच्या विशाल तेल साठ्यांच्या विकासावर एकत्र काम करतील. आम्ही एक तेल कंपनी निवडत आहोत जी या भागीदारीचे नेतृत्व करेल. कोणाला माहित आहे, कदाचित पाकिस्तान कधीतरी भारताला तेल विकेल.

विशेष म्हणजे पहलगाम हल्ल्यानंतर अमेरिकेने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर यांना व्हाईट हाऊसमध्ये बोलावले होते.या काळात, पाकिस्तान क्रिप्टो कौन्सिलने ट्रम्प कुटुंबाशी संबंधित वर्ल्ड लिबर्टी फायनान्शियल सोबत १७,००० कोटी रुपयांच्या क्रिप्टो व्यवसायासाठी करार केला.या दरम्यान जनरल मुनीर यांनी व्हाईट हाऊसमध्ये ट्रम्प यांची भेट घेतली.काही दिवसांनी, पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांचीही भेट घेतली.

युक्रेन रशिया युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारत रशिया ट्रम्प यांनी पाकिस्तानला जवळ करत पाकिस्तानशी हात मिळवले.अमेरिका पाकिस्तानला जवळ करणार हे तेव्हाच लक्षात आले की जेव्हा १९ जून रोजी, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांना व्हाईट हाऊसमध्ये रात्रीच्या जेवणासाठी आमंत्रित करून भारताच्या या कट्टर प्रतिस्पर्धी शेजारी देशाबद्दल अमेरिकेचे धोरण बदलत असल्याचे संकेत दिले होते. ३१ जुलै रोजी पाकिस्तानसोबत व्यापार करारावर स्वाक्षरी करून, ट्रम्प प्रशासनानेही त्यांच्या बदललेल्या धोरणाचे जोरदार संकेत दिले आहेत.

पाकिस्तानची अर्थव्यवस्था जर्जर झाली आहे. डूबने वाले को तीनके का सहारा ही म्हण पाकिस्तानला लागू होते. डुबत्या अर्थव्यवस्थेला आज अमेरिकेची साथ पाकिस्तानला मिळत आहे त्यामुळे नवाब शरीफ यांनी भारत अमेरिका कराराला ऐतिहासिक म्हटले आहे. पाकिस्तानने बऱ्याच काळापासून आपल्या किनाऱ्याजवळ मोठ्या प्रमाणात तेलाचे साठे असल्याचा दावा केला आहे, परंतु या साठ्यांचा वापर करण्यात त्यांनी कोणतीही प्रगती केलेली नाही. सध्या देश आपल्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मध्य पूर्वेतून तेल आयात करतो.

अमेरिका आणि पाकिस्तानमधील संबंध नेहमीच गुंतागुंतीचे राहिले आहेत आणि वेळोवेळी बदलत राहिले आहेत. १९४७ मध्ये पाकिस्तानला स्वातंत्र्य मिळाल्यापासून, अमेरिकेने पाकिस्तानला विविध प्रकारची मदत केली आहे, ज्यात लष्करी आणि आर्थिक मदतीचा समावेश आहे. १९७९ मध्ये सोव्हिएत युनियनने अफगाणिस्तानवर आक्रमण केल्यानंतर, अमेरिकेने सोव्हिएत विरोधी शक्तींना पाठिंबा देण्यासाठी पाकिस्तानला महत्त्वपूर्ण मदत केली. तथापि, ९/११ च्या हल्ल्यानंतर, अमेरिकेने दहशतवादाविरुद्धच्या लढाईत पाकिस्तानला सहकार्य केले. प्रत्येक देश आपले हित प्रथम ठेवतो, परंतु स्वतःचे हित साधणे आणि इतरांचा विश्वास तोडणे या पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. अनेक तज्ञांच्या मते, अमेरिकेचा इतिहास असा आहे की तो स्वतःचे स्वार्थ पूर्ण करण्यासाठी इतरांचा धूर्तपणे वापर करतो. भारताने अमेरिकेच्या धूर्त खेळीपासून भारताने सावध असायला पाहिजे.अमेरिका विविध देशांसोबत खेळत असलेल्या खेळाचा भारताने भाग बनू नये. अमेरिका आपले हितसंबंध पूर्ण करण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब करतो.अमेरिका भारताचा वापर करण्यास खूप उत्सुक आहे, परंतु भारताने अमेरिकेचे साधन अजिबात बनू नये. देशांना आपसात लढवणं हा अमेरिकेचा स्वभाव आहे. जगात आपले वर्चस्व टिकवून ठेवण्यासाठी वेगवेगळ्या देशांना एकमेकांविरुद्ध उभे करणे हा वॉशिंग्टनचा स्वभाव आहे.भारताला अमेरिकेपासून सावध राहण्याची गरज आहे.

# लेनिनच्या मदतीने इंग्रजी राजवट उलथून टाकण्याची टिळकांची योजना होती-डॉ.वि ल धारूरकर

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – लेनीनच्या मदतीने भारतातील इंग्रजी राजवट उलथून टाकण्याची योजना लोकमान्य टिळकांनी तयार केली होती असे मत प्रसिद्ध इतिहास संशोधक आणि माजी कुलगुरू डॉक्टर विल धारूरकर यांनी व्यक्त केले ते नारायणराव उजळंबकर वाचनालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित ''क्रांतिकारक टिळक'' या व्याख्यान प्रसंगी बोलत होते.



प्रारंभी वाचनालयाच्या वतीने विजय जोग यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात सर्वांचे स्वागत केले पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि त्यांचे पुष्पगुच्छ देऊन गणेश महाजन यांनी स्वागत केले . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय मजदूर संघाचे माजी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दौलतराव मस्के हे होते.

आपल्या भाषणामध्ये डॉक्टर धारूरकर यांनी लोकमान्य टिळकांच्या क्रांतिकारक कार्यावर चौफेर प्रकाश टाकला त्यांनी असे प्रतिपादन केले की लोकमान्य टिळकांनी नव्या संकल्पनांचा विकास केला राष्ट्रीय महासभेला मवाळांच्या प्रभावातून मुक्त करून जहाल व क्रांतिकारक रूप प्राप्त करून दिले आणि तिसरे म्हणजे त्यांनी आपल्या चतुसूत्री द्वारे राष्ट्रीय जीवनाला संपूर्णपणे नवी कलाटणी दिली.

स्वराज्य स्वदेशी राष्ट्रीय शिक्षण आणि परकीय वस्तूवरील बहिष्कार ही त्यांच्या चतुसूत्रीची प्रमुख वैशिष्ट्ये होती ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि ते मी मिळविणारच'' अशी प्रतिज्ञा करून टिळकांनी होमरूल चळवळ सबंध देशभर गतिमान केली तसेच त्यांनी स्वदेशी वस्तूंचा वापर उत्पादन आणि प्रसार यावर अधिक भर दिला त्यासाठी पैसा फंड उभा केला आणि अनेक सहकारी सूत गिरण्या स्थापन केल्या, देशी उद्योगांना त्यांनी प्रोत्साहन दिले महाराष्ट्राच्या सर्व भागात त्यांनी दौरे करून उद्योजकता विकासावर अधिक भर दिला. इंग्रजांच्या प्रभावाखालील गुलामगिरीचे शिक्षण देशाला कुचकामी बनवीत आहे त्यासाठी त्यांनी राष्ट्रीय शिक्षण ही संकल्पना मांडली आणि राष्ट्रीय शिक्षण या संकल्पनेचा त्यांनी आपल्या न्यू इंग्लिश स्कूल आणि फर्ग्यूसन महाविद्यालयाच्या माध्यमातून जोरदार पुरस्कार केला विदेशी वस्तूवरील बहिष्कार ही एक लोक चळवळ बनविली त्यांनी फर्ग्यूसन महाविद्यालयासमोर जी विदेशी कपड्यांची होळी केली त्यातूनच विनायक दामोदर सावरकर या क्रांतिकारक युवकाचे नेतृत्व विकसित झाले असे सांगून डॉक्टर धारूरकर पुढे म्हणाले की सावरकरांना शिवाजी शिष्यवृत्ती साठी त्यांनी शिफारस केली तसेच पंडित श्यामजी कृष्ण वर्मा यांना पत्र लिहून सावरकरांच्या लंडनमधील वास्तव्यासाठी विशेष मार्गदर्शन केले टिळकांच्या क्रांतिकारक विचारांची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी आणि कृती करण्याचे सामर्थ्य सावरकरांनी प्रकट केले महाराष्ट्रामध्ये झालेल्या सर्व ब्रिटिश विरोधी चळवळीचे टिळक हे मार्गदर्शक होते परंतु त्यांच्यावर कारवाईसाठी पुरावे उपलब्ध होत नाहीत हे पाहून इंग्रजांनी त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखांची छाननी करून त्या आधारे त्यांच्यावर अनेक खटले चालविले असेच सांगून डॉक्टर धारूरकर यांनी टिळक ऑन ट्रायल या ग्रंथाचा संदर्भ दिला आणि लोकमान्य टिळकांनी आपल्या केसरी या मराठी आणि मराठा या इंग्रजी साप्ताहिकाच्या माध्यमातून देशांमध्ये कशी अपूर्व लोकजागृती घडविली ते स्पष्ट केले. अग्रलेखातून क्रांतिकारक विचारांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होऊ लागला वांगी दाखल डॉक्टर धारूरकर यांनी टिळकांच्या काही अग्रलेखाची उदाहरणे स्पष्ट केली उजाडले पण सूर्य कोठे, हे आमचे गुरुच नाहीत, बंदुकीच्या पेटत्या गोळ्या, खाली झालेल्या सभा सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय? यासारख्या अग्रलेखांचा लोकमानसावर पडलेला विलक्षण प्रभाव हा खरोखरच नव्या युगाची पहाट घडविणारा ठरला आपल्या मराठा या इंग्रजी साप्ताहिकातून टिळकांनी महाराष्ट्राला कार्ल मार्क्सच्या विचारांची ओळख करून दिली असे सांगून डॉक्टर धारूरकर पुढे म्हणाले की टिळकांच्या समग्र कार्याची तीन वैशिष्ट्ये समोर येतात लोक चळवळ लोकपत्रकारीचा आणि लोक संघटन या तीन तत्त्वांच्या आधारे त्यांनी सारा देश ढवळून काढला. लॉर्ड कर्झन यांनी केलेल्या बंगालच्या फाळणी विरुद्ध त्यांनी देशभर रान पेटविले त्यामुळे अखेर सरकारला बंगालची फाळणी रद्द करावी लागली. टिळकांना दीर्घायुष्य लाभले असते तर त्यांनी फाळणी पासून देशाला वाचविले असते असे सांगून डॉक्टर धारूरकर पुढे म्हणाले की लोकमान्य टिळक यांनी आपल्या खंडप्राय लेखनातून एक संशोधक या नात्याने अनेक नवनवे विषय हाताळले. डॉक्टर राधाकृष्णन असे म्हणतात की जर टिळक राजकारणी झाले नसते तर ते एक प्रथम श्रेणीचे गणिती म्हणून इतिहासात नोंदविले गेले असते आर्कटिक होम इन द वेदास हा त्यांचा ग्रंथ आर्यांच्या मूल वस्तीस्थानावर प्रकाश टाकणारा आहे तसेच टिळकांच्या समग्र साहित्याचे दहा खंड हे त्यांच्या विलक्षण लोकप्रतिभेचे आणि राष्ट्रीय प्रज्ञाचे दर्शन घडवितात.

डॉक्टर धारूरकर आपल्या भाषणात पुढे असे म्हणाले की टिळकांनी भारत रशिया मैत्रीचा भक्कम पाया घातला तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लंडनच्या बातमीपत्रांमध्ये रशियन क्रांतीचे स्वागत असा एक लेख लिहिला आहे जेव्हा सावरकरांनी समुद्रात उडी मारली तेव्हा त्यांची बाजू पॅरिसमध्ये कार्ल मार्क्सच्या नातवाने मांडली होती असाही त्यांनी संदर्भ दिला महापुरुषांचे जीवन अभ्यासताना सखोल साधन चिकित्सा आणि दूरदृष्टी अत्यंत आवश्यक असते असेही त्यांनी सांगितले डॉक्टर धारूरकर यांनी आपल्या भाषणात डॉक्टर यदी फडके धनंजय खीर तसेच प्राध्यापक प्रधान आणि टिळक समग्र वाड्मय या ग्रंथातील संदर्भ यांची नोंद घेऊन सखोल शास्त्रीय विश्लेषण केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात दौलतराव मस्के यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या क्रांतिकारक कार्याची ओळख करून दिली त्यांनी कथा कादंबऱ्या तसेच पोवाडे या माध्यमातून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ यशस्वी केली त्यांची फकीरा ही कादंबरी म्हणजे एक श्रेष्ठ कलाकृती होय अण्णाभाऊंनी शाळेत न जाता साहित्याची निर्मिती केली हा एक अपूर्व चमत्कार म्हटला पाहिजे त्यांच्या साहित्यातून युगप्रवर्तक क्रांतिकारक विचार स्पष्ट होतात असेही त्यांनी सांगितले

याप्रसंगी झालेल्या चर्चेमध्ये श्री जयंत भयरेकर तसेच श्री डबिर आणि गोरख शिरसे तसेच श्री बुरांडे यांनी भाग घेतला श्री गणेश महाजन यांनी सर्वांचे आभार मानले आणि चहापानानंतर व्याख्यानाची सांगता झाली . या व्याख्यानमालेस एन २, एन ३ परिसरातील ज्येष्ठ नागरिक आणि युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.


## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख- 8



आपण ज्या वास्तूमध्ये रहातो, आपला जो व्यवसाय वा नोकरी आहे, आपली कंपनी, इंडस्ट्री असेल एकूणच आपली, एक विशिष्ट 'ओळख' असेल आधुनिक जगतात...! तर आपल्याला रंग शास्त्राच्या अचुक मदतीने, प्रगतीचा मार्ग, स्वांतसुखाय दिनचर्या आणि स्वप्न पूर्तीला मूर्तस्वरुपात खरंच पाहण्याचा अनुभव घेता येतो....!

एरवी आपलं दैनंदिन धावपळीतलं जीवन आपण जगतच असतो. नोकरदार किंवा व्यावसायिक.... दोघांच्याही दैनंदिनीत थोड्या फार फरकाने साम्य असतेच. सकाळीच नोकरीच्या ठिकाणी वेळेत पोहोचणं, प्रलंबित आणि नवीन कामे यांचा बोजा, घरची कामे कौटुंबिक जबाबदाऱ्या- घरच्या वयोवृद्धांची काळजी, मुलांचे अभ्यास, जर दोघेही पती-पत्नी नोकरी वा व्यवसायात व्यग्र व्यस्त असतील तर मुलांकडे होणारं दुर्लक्ष, कर्ज, कर्जाचे हप्ते, देणे दार आणि बरंच काही....! या साऱ्या प्रश्नांना, कर्तव्यांना सामोरे जावं लागत असतं."

यातून उद्भवणारे शारिरिक आजार, मानसिक आजार केंव्हा शरिरात घर करतात, कळत पण नाही. या साऱ्यांवर रंगशास्त्र- रंग चिकित्सा आणि 'वास्तुशास्त्र पेंटींग' आपल्याला फार दिलासा देतं. कारण...

रंग आणि रंगाकार जे विशिष्ट खास बनवून घेतलेल्या 'वास्तुशास्त्र पेंटींग 'आपण आपल्या वास्तुत, भिंतीवर लावतो, तेव्हा थकून भागून आलेले आपण आपल्या वास्तूत 'पेंटींग' असलेल्या हॉल वा खोली वा बैठक रूम मध्ये विश्रांती साठी बसतो अन् सहजपणे या 'वास्तुशास्त्र पेंटींग' कडे आपण जेव्हा पहातो, तेव्हा खास आपल्या साठी घेतलेले/बनवलेले ते पेंटींग सुध्दा आपल्याकडे पहातच असते. त्या पेंटींग मधील "सकारात्मक" रंगाकार-प्रतिके, त्या पासून निघणारी तेजो किरणे, आपल्या डोळ्यांच्या 'रेटीना' व्दारे, थेट मेंदू पर्यंत पोहोचतात. आणि रंगज्ञान 'झाल्यामुळे आपल्याला, समोरचे 'वास्तुशास्त्र पेंटींग' दिसते. आपणाला आपल्या अनाकलनीय प्रश्नांना पर्याय मिळायला परिस्थिती निर्माण होऊ लागते.

क्रमश:.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.



कार्यक्रम रंगतो झकास
कारण अँकर भावनाची आहे साथ



मंगळागौरी डेकोरेशन,
मंगळागौरी, डोहाळे,
बारसे ग्रुप सादरीकरण ,
तसेच स्वतंत्र अँकरिंगचे कार्यक्रम
आणि विविध गिफ्टचे प्रकार
संपर्क : अँकर भावना
7588349455




## जात्यावरच्या ओव्या......

वाट पाहूपाहू
डोळे झाले कुकावाणी
बंधवान माझ्या
मन केलं लोकावाणी ||१८७||

जेवण जेवले
दुधावर ली गं साय
सांगते माय बाई
चुलती नाही, मही माय ||१८८||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## तात्या आणि सोमनाथ ...
### (माझ्या चांदणेशब्द फुलांचे या पुस्तकातील लेख)




ज्योतिर्मय साहित्य


कधी कधी आपल्याला अत्यंत साधी वाटणारी माणसेही काही तरी शिकवून जातात. आपण नेहमी वरच्या रंगरूपाला भुलणारी माणसं. पण कधी कधी वरवरचे हे रंगरूप फसवं पण असू शकतं. संत चोखामेळा म्हणतात, ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा, काय भुललासी वरलिया रंगा... हेअगदी खरे आहे. कधी कधी बाजारात आपण भाजी घ्यायला जातो. तेथे पाणी मारलेल्या भाज्या, रासायनिक खते वापरून वाढवलेल्या भाज्या किंवा हायब्रीड भाज्या अगदी हिरव्यागार, ताज्या टवटवीत दिसतात. पण आरोग्याच्या दृष्टीने त्या चांगल्या नसतात. याउलट सेंद्रिय भाज्या, गावरानी भाज्या दिसायला आकर्षक दिसत नाहीत पण त्या आरोग्याला चांगल्या असतात. अशीच माझी गाठ अगदी साध्या दिसणाऱ्या, फारसे न शिकलेल्या माणसांच्या एका जोडीशी पडली.



झाले असे की काही दिवसांपूर्वी मी माझ्या घराच्या दुरुस्तीचे थोडेसे काम काढले होते. जुना किचन ओटा पाडून नवीन करायचा होता आणि इतरही काही किरकोळ कामे होती. या कामासाठी मी माझ्या परिचयातल्या सोमनाथ नावाच्या मिस्त्रीला बोलावलं होतं. चाळीसगाव जवळच असलेले तांबोळे नावाचे त्याचे गाव. तिथून तो कामासाठी यायचा. सकाळी नऊ साडेनऊलाच सोमनाथ मिस्त्री आणि त्याची माणसे कामासाठी हजर व्हायची. दोन तीन दिवसानंतर किचन ओट्याचे मोजमाप करण्यासाठी सोमनाथ मिस्त्रीसोबत एक मध्यम उंची आणि सडपातळ बांधा असलेली एक व्यक्ती होती.

अंगात अगदी साधे, इस्त्री न केलेले पण स्वच्छ सुती कपडे त्यांनी घातले होते. पांढरा शर्ट आणि पांढरा पायजमा. त्यांच्या डोक्यावरचे केस पांढरे झाले होते. वर्ण गौर होता. चेहऱ्यावर तेज होते. त्यांचे वय किमान साठ पासष्ट वर्षे तरी असावे असे वाटत होते. सोमनाथ मिस्त्री मोजमाप करत असताना मधून मधून त्या व्यक्तीला काहीतरी विचारीत होता. बोलताना तो त्यांना तात्या असे संबोधत होता. तात्यांचे बोलणे जरा खेड्यातील बोलीभाषेतच होते. पण बोलताना त्यांचा अनुभव, हुशारी सहज लक्षात येत होती.

मग मी सोमनाथ मिस्त्रीला विचारले की हे कोण ? तो म्हणाला, हे तात्या. माझ्याच गावी राहतात. गवंडी काम करतात. बऱ्याच वेळा काही जास्तीचे काम असले की मी त्यांना बोलावून घेतो. बांधकामाची पूर्वतयारी आणि विटा, वाळू,सिमेंट इ आवश्यक ते बांधकाम साहित्य मागवल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. तिसऱ्या चौथ्या दिवसापासून तात्या कामासाठी नियमितपणे येऊ लागले. तात्या ज्या पद्धतीने काम करीत ती पाहून मी थक्क झालो. **(क्रमशः)**





दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## उपदेशलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

रामकृष्ण, नारायण, गुरूदेव दत्तात्रेय, गणपती बाप्पा, ॐ, विश्वनाथ, केशव, भार्गव, शामराज, गरूडध्वज, विठ्ठल, शिवशंकर, महाविष्णू ज्याला जे नाव प्रिय आहे त्याने त्या नावाचा मंत्र जपावा. शेवटी तो परमात्म्याच्या जवळ पोहचणार आहेच.

परमार्थ साधना करत असताना ती अनेक मार्गाने केली जाते. त्यावेळी अनेक अनुभव येतात. ज्याला जे साधन साधते आवडते ते वापरावे. निरूपण, भजन, किर्तन, विणावादन, लेखन, वाचन, ज्या साधनेद्वारे आनंद मिळतो त्या साधनाने ईश्वर भक्ति करावी. साधना करताना मन व देहदेखील सुक्ष्म बनतात. त्यामुळे काही अतींद्रिय अनुभव येतात. ज्याला असे नाद व प्रकाश यांचे अनुभव येतात.

परमार्थाच्या वाटेत वर सर्व काही सात्विक आहे पण यासाठी आत्मज्ञांनाची पार्श्वभूमी हवी हे मात्र खरं.

समर्थ योगविद्येचे जाणते होते त्यांनी बलोपासनेद्वारे


या विद्येचा प्रसार व प्रचार केला. मारूतीचे ते उपासक होते म्हणून भारतभर मारूतीचे मंदिरं बांधली.

खेचरी, भूचरी, चाचरी व अगोचरी या मुद्रा कराव्यात. आसने करावीत. कोणी तांबडा, पांढरा, काळा, निळा अतींद्रिय प्रकाश दाखवतात. तर कोणी अनाहत नावांचा अतींद्रिय नाद ऐकवतात. आघाताशिवाय होणारे व आंत ऐकुं येणारे हे नाद वेणुनाद,पैजणनाद, घुंघरूनाद, टाळनाद, पखवाज नाद, मेघनाद असे अनेक.प्रकार असतात.

कोणी कर्मयोगी, कोणी उपासनामार्ग, तर कोणी आठ पाय-यांचा पातंजल योग सांगतो. शरिरातील सहा चक्रांचे भेदन शिकवतो.

आठ प्रकार - यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी **(क्रमशः)**

## भवरोगापासून मुक्ततेचा उपाय - सत्संगती व नामस्मरण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

एका गावात एक वैद्य राहात होता. त्या वैद्याला कोणाला काय रोग झाला आहे हे तोंडावरून समजत असे. त्याने एक दिवस एका मनुष्याला आपल्या घरावरून जाताना पाहिले आणि त्याला आत बोलावले. वैद्याने त्या माणसाला सांगितले की, ''तुला एक भारी रोग झाला आहे; पण मी सांगतो ते औषध घे आणि मी सांगेन त्याप्रमाणे पथ्य पाळ, म्हणजे तुझा रोग बरा होईल.'' वैद्याने सांगितलेले औषध आणि पथ्य त्या मनुष्याने पाळले नसते तर त्यात त्या वैद्याचे काही नुकसान होते का ? त्याप्रमाणेच संतलोक जे आपल्याला करायला सांगतात, त्यात त्यांना स्वत:ला काही मिळवायचे असते का? आपल्याला गुरू सांगत असतात, त्यांचे ऐकल्याने आपलाच फायदा होत असतो. ते आपल्याला भवरोग झाला आहे असे सांगतात आणि त्याकरिता संतसंग करा आणि नामात राहा म्हणून सांगत असतात. ते जे सांगतात ते स्वत: अनुभव घेऊनच सांगत असतात. औषध सोपे असले म्हणून त्यात गुण नाही असे म्हणून कसे चालेल ? तुकारामांनी आपल्या उपासनेची शपथ घेऊन सांगितले आहे की, नामस्मरणासारखे सोपे साधन नाही. तुमचा हल्लीच्या साधूंवर विश्वास नसला तरी समर्थ आणि तुकाराम यांनी सांगितले त्यावर तरी विश्वास ठेवायला काय हरकत आहे ? त्यांनी तुमच्या कल्याणाकरिताच ते साधन सांगितले आहे. ते तुम्ही न कराल तर त्यांचे काही नुकसान नाही, तुमचेच नुकसान आहे; तरी त्याचा विचार करा. आपल्याला रोग झाला आहे अशी आपली अगोदर खात्री झाली पाहिजे, म्हणजे निम्मे काम झाले. आपल्याला रोग झाला आहे असे पक्के कळल्यावर आपण औषध घेण्याचे टाळणार नाही. संसारात सुख नाही असे आपल्याला दिसत असताना, ज्या योगाने सुख मिळेल त्याच्या खटपटीला लागले पाहिजे. त्याकरिता होईल तितके नामात राहण्याचा प्रयत्न करा, म्हणजे तुम्हाला खरे समाधान मिळेल. एका मनुष्याने तीस वर्षे मनापासून नोकरी केली. तो म्हणाला, ''भगवंताची पूजा आणि भक्ती कशी करावी हे मी नोकरीपासून शिकलो.'' त्याला विचारले, ''ते कसे ?'' तेव्हा त्याने उत्तर दिले, ''नोकरीमध्ये वरिष्ठांच्या मर्जीप्रमाणे वागावे लागते. तो जिथे बदली करील तिथे आपल्याला जावे लागते; मग घरात अडचण असली तरी तिथे आपले काही चालत नाही. म्हणजे आपलेपण बाजूला ठेवावे लागते. आता मी सेवानिवृत्त झाल्यावर मालक तेवढा बदलला. आता मी वरिष्ठाच्या ठिकाणी भगवंताला ठेवले आहे. भगवंत हा श्रेष्ठ वरिष्ठ आहे, कारण तो माणसासारखा स्वार्थी नाही. तो अत्यंत नि:स्वार्थी असल्यामुळे माझ्या हिताचेच नेहमी घडवून आणतो. म्हणून मी आता अत्यंत आनंदात आहे.'' याचप्रमाणे प्रत्येक माणसाने आपल्या प्रपंचापासून परमार्थ करायला शिकले पाहिजे. हेच आपल्या जीविताचे सार आहे. अनन्यतेशिवाय भगवंताची प्राप्ती नाही; त्यातच भक्ति जन्म पावते.

## ॥ संत महात्म्य ॥
लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

इथेही आपणास विषयाकडे वळलेले मन दुःख देणारे तर ब्रह्मरूप झालेले मन हे सुख देणारे, महानंद देणारे व उन्मनी अवस्थेत गेलेले दिसून येते.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात

नको नको मना गुंतू माया जाळी
काळ आला जवळी ग्रासावया
काळाचीए उडी पडेल बा जेव्हा
सोडविना तेव्हा मायबाप

विषयात अडकलेले मन हे माया जाळात अडकलेले आहे तिथे त्याला गुंतू देऊ नकोस तर ते ब्रह्मरूप कर आत्म्याकडे वळव कारण केव्हाही काळ ग्रासेल असेच तुकाराम महाराज सांगतात.

समर्थ रामदास स्वामी मनाविषयी काय म्हणतात तेही आपण पाहू

मना पाप संकल्प सोडून द्यावा
मना सत्य संकल्प जीवि धरावा
मना कल्पना ते नको विषयाची
विकारी घडे हो जनी सर्व ची ची

विषयात अडकलेले मन हे पाप संकल्प करणारे असते तर सत्य संकल्प हा केवळ आत्म्यात लीन होणारे मनच करू शकते. ते करावे. मनात विषयांची कल्पना करू नये. कारण त्यामुळे विकार ग्रस्त मन होते. असेच रामदास स्वामी हे सांगतात.

संत कबीर म्हणतात कबीरा मन निर्मल करे जैसे गंगाका नीर पाछे पाछे हरी फिरे कहत कबीर कबीर मनातील विकारांचा मळ काढून मन हे गंगेच्या पाण्या सारखे निर्मळ करायला हवे. त्यासाठीची साधना करायला हवी. असे केले तर तुम्हाला परमेश्वराच्या पाठीमागे लागण्याची गरज नाही, तर उलट तोच तुमच्या पाठीमागे लागेल. असे कबीर म्हणतात.

आपले मन स्वाभाविकपणे विषयाकडे वळलेले असते. यात सतत नवनवीन कल्पना चे उन्मेश भरून येतात. इच्छा आकांक्षा जन्म घेतात व म्हणूनच असे मन हे अल्पजीवी सुख व दीर्घकाळ दुःख देणारेच ठरते या अल्पजीवी सुखाकडून शाश्वत सुखाकडे जायचे असेल तर मनाचा फेर उलट करून आत्म्याकडे वळवावा लागेल. आणि यासाठी सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या सानिध्यात कठोर साधना ही करावी लागेल. अशी साधना आपण करावी असेच संकेत ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून आपणास देत आहेत.

जीवनाचे ध्येयच मुळी दुःखाची निवृत्ती व सुखाचा शाश्वत लाभ हेच आहे दुःखाचा त्याग होऊन सुखाचा लाभ कसा मिळावा याचा मूलमंत्र देणाऱ्या महान मानसोपचार तज्ञ संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणावर विनम्र भावाने प्रणिपात करून हा भाग इथे संपवूया

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम
जय हरी माऊली

***

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

१२. विनवणी

जुळवोनी दोन्ही कर तव चरणी आलो अंबाबाई
भवारण्य तारोनी तव चरणी शरण तू देई।।
माये तुजवाचोन जगती माझे कोणी नाही
दीनपतित पामर विनवितो मी तुज आई।।
संसारानलाने मी तप्तसंतप्तत्रस्त होई
दीप्तसंदीप्त तू आई मज जवळी घेई।।
चरणापासोनी दूर जाता दूर सुख जाई
येता तव चरणाशी दूर दूर दुःख जाई।।
सर्वसुखाची घागरू विलसते तुझिये पायी
चंद्रहास मागतो करूणेचे दान तू देई।।

१३. जनावाहन

नका हो नका रेणुकाईला विसरू नका
जन्म आमुचा एवढाच पिटण्या डंका।।
हंसासी तारी माता मारी दंभाच्या बका
चळचळा दुष्ट कापती पडता हिची नेत्रशलाका।।
संत्रस्त भक्त होता शिंपिते दयेच्या उदकां।
शक्तीनेच हो हिच्या कुमार वधितो तारकां।।
भवानीमाय ही करितसे भंग संकटखडकां।
चंद्रहास म्हणे रेणुकेला विसरू नका।।



आरोग्य संजीवनी

## पेन किलर गोळ्यांचे शरीरावर होणारे परिणाम

ज्योतिर्मय साहित्य

पेन किलर म्हणजे वेदना नाशक औषध. आजचे जीवन हे खूप धकाधकीचे आहे. सगळे आपापल्या कामात व्यस्त असतात, या व्यस्त जीवन शैलीमुळे कोणाकडे पूर्ण आराम करायला वेळ नाही त्यामुळे त्यांना वेगवेगळ्या व्याधीना सामोरे जावे लागते. कधी कधी ह्या वेदना असह्य होतात आणि वेळ नसल्यामुळे वेदना नाशक गोळ्या घ्यावा लागतात जेणेकरून त्यांना आपल्या पुढच्या कामाला लागता येईल. पण या गोळ्या घेतल्याने कायम स्वरूपी इलाज होत नाही तो तात्पुरता असतो आणि बऱ्याच जणांना हे माहित नसते कि पुढे जाऊन त्यांना या वेदना नाशक गोळ्यांचे वाईट दुष्परिणाम होऊ शकतात.

जास्त करून लोक वेदना नाशक गोळ्या का घेतात ? जेंव्हा आपल्याला वेदना होतात आणि त्या वेदना असहनीय होतात तेंव्हा त्या वेदनांपासून आराम मिळण्यासाठी आपण पेन किलर घेतो. कारण या गोळ्यांमुळे लगेचच आराम मिळतो आणि हळू हळू आपल्याला या गोळ्यांची सवय लागते, या गोळ्या जर आपण सतत घेत असू तर आपल्याला हे पुढे जाऊन धोकादायक ठरू शकते.

पेन किलर गोळ्यांमुळे होणारे नुकसान:

पेन किलर जास्त प्रमाणात घेतल्या मुळे आपण वयस्कर दिसू लागतो.

रिकाम्या पोटी कधीही अशा गोळ्या घेऊ नका कारण यामुळे किडनी ( मूत्रपिंड ) संबंधी समस्या होऊ शकतात. तसेच रोज घेतल्याने यकृत सबंधीही समस्या उद्भवतात.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

अशा गोळ्या रोज घेतल्याने आपल्याला घाबरल्या सारखे होते, निद्रानाश होते, तसेच अस्वस्थता वाढते.

पेन किलर जास्त प्रमाणात घेतल्याने रक्तदाब देखील कमी होतो.

काही खास गोष्टी लक्षात ठेऊन आपण पेन किलर घेऊ शकता.

जेवल्यावर ३० मिनिटांनंतर ह्या गोळ्या घ्या.

पेन किलर कमीत कमी घेण्याचा प्रयत्न करा.

जर वेदना सारख्या सारख्या आणि असहनीय होत असतील तर डॉक्टरचा सल्ला घ्या. पेन किलर नेहमी पाण्या सोबतच घेतल्या पाहिजेत.

पेन किलर च्या गोळ्या ह्या नेहमी डॉक्टर च्या सल्याने घेतल्या पाहिजेत.

## ॥ श्री राम कथा ॥



वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

जिथे कार्य कारण भावाची संगती विचाराने लागत नाही अशा कृतीचे आचरण जर आपणा कडून घडले तर ते अधपताना कडे नेणारे असते.

लीला हा शब्द सहजता या प्रमाणेही असतो

रेड्यास बोल म्हणाले की तो वेद बोलला.हे सहजतेने घडले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

अनुभाव चरित्राचा आचरणातून आपणास आनंद मिळतो.भागवतात कृष्णाचे चरित्र हे बहुतांश लीला चरित्र आहे, तर राम चरित्र हे, बहुतांश अनुभाव चरित्र आहे..

आम्हाला गोवर्धन पर्वत उचलता येणार नाही पण एखाद्याला छत्री तर देऊन मदत करता येईल ! हा लीला चरित्रातील अनुभावाचा संदर्भ घेण्या सारखे होईल.म्हणजे आचरण करावे असा भाग असेल.

वाल्मिकिनी चमत्कृती ला रामायणात स्थान दिले नाही. म्हणून हे अनुभाव चरित्र आहे. इतर रामायणात लीला देखील आल्या आहेत.वाल्मिकिनी नारदाना असा कोणता देव सांप्रत काळी आहे? हा प्रश्न विचारला नाही तर, असा कोणता नर आहे ?असे ते विचारतात. त्यामुळे आपणास वाल्मीक रामायण अधिक जवळचे वाटते.

आपण कसे वागावे? हे कळावे म्हणून संत तसे जगून दाखवितात.म्हणुन संतांचे चरित्र हे अनुभावीक असते. रामचंद्र प्रभूचे चरित्र हे अनुभाव चरित्र म्हणून घ्यावे.

**(क्रमशः)**

## फुलमाला....



आर्किड फुल

ऑर्किडची फुले असतात नाजूक आणि देखणी
जगभरात असते या फुलाला खूप खूप मागणी

या फुलांमध्ये असतात विविध रंग आणि आकार
यांची शेती केली जाते आणि भरवला जातो बाजार

सुंदर रुपाबरोबर परिपूर्ण असतात सुगंधानी
अनेक दिवस ही फुले राहतात ताजीतवानी

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज

# ‘‘माय मराठी कवितांजली‘‘ खुले कविसंमेलन संपन्न


**ज्योतिर्मय साहित्य**
**नवी मुंबई (प्रदीप बडदे)–** अस्मिता साहित्य, संस्कृती आणि कला मंडळ, नवी मुंबई यांच्या वतीने आयोजित ‘‘माय मराठी कवितांजली‘‘ हे पहिले खुले कविसंमेलन, रविवारी दिनांक २७ जुलै २०२५ रोजी संस्थापक गणेश खाडे व अध्यक्षा सुचिता खाडे यांच्या नियोजनाखावी मोठ्या उत्साहात आणि साहित्यप्रेमी रसिकांच्या उपस्थितीत दिमाखात संपन्न झाले. संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण कार्यक्रमाची मध्यवर्ती भावना ‘‘मराठी भाषेचा जागर करणे आणि संकृती टिकविणे हिच होती‘‘. कार्यक्रमात सहभागी कवींनी आपल्या कवितांमधून मायबोली मराठीचे सौंदर्य, गोडवा, वैशिष्ट्ये आणि तिचे आपल्याशी असलेले अतूट नाते अत्यंत हृदयस्पर्शी पद्धतीने उलगडून दाखविले. मराठी ही केवळ भाषा नसून एक संस्कृती आहे, ओळख आहे, आणि आपल्या अस्मितेचे प्रतीक आहे हे आपल्या कवितांमधून अधोरेखित केले.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व मराठी अभिमानगीताने झाली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे व जाणकार साहित्यिकांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचे महत्व पटवून देत, नवोदित कवींना आपले लेखन मराठीतूनच बळकट करण्याचे स्पष्ट आवाहन केले. काही कवितांमधून मराठी भाषेच्या आजच्या स्थितीवरील चिंतन, इंग्रजी व अन्य भाषांच्या प्रभावातील काळजीही व्यक्त झाली. काहींनी बालपणातल्या मराठी पाठशाळेच्या आठवणी उभ्या करत तर काहींनी आईच्या गोड मराठी लळ्याचा भावनात्मक आविष्कार कवितेतून व्यक्त केला.

या बहारदार संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गजानन मिटके (गझलकार), राजेश साबळे ओतूरकर (गीतकार), राजेंद्र घरत(दै.आपले नवे शहर –उपसंपादक), प्रतिभा सराफ (ज्येष्ठ कवयित्री) हे मान्यवर उपस्थित होते. तसेच मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पालघर, नगर या जिल्ह्यांतून अनिल सोनवणे, रुपेश राणे, वर्षा दौंड, ज्ञानेश्वर चौरे, वंदना जाधव, धनंजय पाटील, प्रिति वाजपे, ज्योती राखुंडे, दिलीप जाधव, नीरज रोकडे, कबीर फिरस्ता, प्रणोती पाटील, सुमित हजारे, शुभा थुलकर, श्वेता मांदाडकर, विवेक जोशी, स्वाती शिवशरण, अमित नरेंद्र गायकर, सिमा कांबळे, पवन इंगोले, लक्ष्मण माने इत्यादी साहित्यिकांनी आपली प्रार्थनिय उपस्थिती दर्शविली.

पहिल्या सत्रात कवयित्री सुचिता खाडे यांच्या ‘‘कुतुहल–बालगीते‘‘ पुस्तकाचे मोठ्या थाटात प्रकाशन पार पडले, प्रमुख पाहुणे व प्रसिद्ध बालसाहित्यिक, कवी व शिक्षणतज्ज्ञ यांनी लेखिकेचे अभिनंदन करत बालमनावर सकारात्मक प्रभाव टाकणाऱ्या लेखनाची गरज अधोरेखित केली. संग्रहात बालवयातील भावविश्व, निसर्ग, कल्पनाशक्ती आणि जीवनमूल्ये या विषयांवर आधारित गोडसर, सोपी आणि प्रभावी बालकविता समाविष्ट आहेत. कार्यक्रमात पुस्तकातील काही निवडक बालगीते सादर झाली. त्यांना उपस्थित लहानग्यांकडून आणि पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण कार्यक्रम बालकवितेच्या आनंदात न्हालेला होता. ‘‘कुतुहल–बालगीते‘‘ हे पुस्तक नव्या पिढीला साहित्याची गोडी लावणारे ठरेल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी कवींना सन्मानपत्र देण्यात आले व आयोजकांनी पुढील कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्याचा संकल्प केला. रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे कार्यक्रम संस्मरणीय ठरला.



विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

## कर्मयोगी रवींद्रनाथ

प्रख्यात वनस्पती शास्त्रज्ञ डॉ जगदीशचंद्र बोस हे गुरुदेवांचे घनिष्ठ मित्र होते. पद्मा नदीत पद्मा नावाच्या आपल्या आवडत्या बोटीत बसून गुरुदेवांनी आपल्या आयुष्याची काही वर्षे काढली. या काळात त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. कष्टकऱ्यांच्या सुखदुःखांशी ते एकरूप झाले आणि याच काळात त्यांची साहित्य निर्मिती देखील झाली. या काळात शनिवार रविवारी डॉ जगदीशचंद्र बोस त्यांच्याकडे बोटीवर मुक्कामी असत. गुरुदेवांची नवीन कथा, कविता किंवा नाटक यांचे ते प्रथम वाचक किंवा श्रोते असत. दोघेही एका दृष्टीने संशोधक होते एक वनस्पतींचे रहस्य शोधणारा आणि दुसरा मानवी जीवनाचेच गूढ उकलण्याचा प्रयत्न करणारा.

विद्यार्थ्यांना मातृभाषेतच शिक्षण दिले पाहिजे. इंग्रजीतले ज्ञानभांडार, तत्त्वज्ञान, विचारधन मातृभाषेत विद्यार्थ्यांसाठी खुले केले पाहिजे असे त्यांचे मत होते. परंतु ते केवळ बोलणाऱ्यातले नव्हते. उत्तम इंग्रजी जाणत असताना सुद्धा व्यासपीठावरून ते बंगाली भाषेतच श्रोत्यांशी संवाद साधत. कलकत्ता विद्यापीठामध्ये पदवीदान समारंभात बंगालीतून भाषण करणारे गुरुदेव हे पहिले भारतीय विचारवंत होते. त्यावरून त्यांची तथाकथित इंग्रजाळलेल्या शिक्षित लोकांनी कुचेष्टा केली. परंतु गुरुदेवांना त्याची पर्वा नव्हती. असे हे बहुआयामी व्यक्तिमत्व होते गुरुदेवांचे !

गुरुदेवांची सजीव शिल्पे

गुरुदेवांसारखी प्रतिभासंपन्न माणसे युगायुगातून क्वचितच जन्म घेतात. अशा व्यक्तींचा परिस्पर्श ज्या ज्या गोष्टींना लाभतो, त्या त्या गोष्टींचे सोने होते. मग त्या गोष्टी सजीव असोत की निर्जीव ! त्यांच्या स्पर्शाने निर्जीव गोष्टींमध्ये देखील प्राण फुंकले जातात. शांतिनिकेतन, विश्वनिकेतन आणि श्रीनिकेतन या त्यांच्या संस्था म्हणजे गुरुदेवांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाचे आणि शिक्षणविषयक विचारांचे मूर्त रूप होत्या. त्या केवळ दगडमातीच्या इमारती राहिल्या नाहीत तर त्यांच्यातून वर्षानुवर्षे चैतन्य खेळत राहिले. शेतीचे, शिक्षणाचे नवनवीन प्रयोग झाले. शैक्षणिक आणि सामाजिक क्रांतीची पहाट झाली. क्रांती ही केवळ शस्त्रांनीच होत नसते. गुरुदेवांसारखी माणसे आपल्या विचारातून, कार्यातून आणि लेखणीच्या माध्यमातून क्रांती घडवून आणतात. मनामनात जी परिवर्तन घडवून आणते ती खरी क्रांती !

गुरुदेवांच्या विचारांचा वारसा घेऊन अनेक ध्येयवादी विद्यार्थी या संस्थांमधून बाहेर पडले. अनेक शिक्षक आणि संशोधक त्यांच्या विचारांनी भारले गेले. आणि त्यांनी पुढे गुरुदेवांच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले. तर त्यांच्या सहवासात जी जी माणसे आली, ती अंतर्बाह्य बदलून गेली. अशा व्यक्तींची अनेक उदाहरणे आहेत. त्यातीलच काही उदाहरणे या ठिकाणी मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. गुरुदेव नावाच्या शिल्पकाराने अशा अनेक सजीव शिल्पांना त्यांनी आकार दिला आणि त्यातून सुंदर मूर्ती घडत गेली.

मागील भागात आपण विनोद दा यांचे उदाहरण पाहिले आहे. विनोद दा यांना चित्रकलेची अतिशय आवड होती. परंतु दुर्दैवाने लहानपणापासूनच त्यांची दृष्टी अधू होती. त्यांची दृष्टी अधू असल्यामुळे कोणत्याही चित्रशाळेत त्यांना प्रवेश मिळत नव्हता. परंतु विनोद दा गुरुदेवांच्या संपर्कात आले. गुरुदेवांनी त्यांच्यातील प्रतिभा ओळखली. त्यांच्या अधू डोळ्यातील प्रतिभेचे तेज गुरुदेवांसारख्या व्यक्तीने ओळखले. हा मुलगा पुढे चालून एक उत्तम चित्रकार, मूर्तिकार होऊ शकतो हे त्यांना जाणवले. **(क्रमशः)**

# जगण्याचा अर्थ

**ज्योतिर्मय साहित्य**

एका निवांत आणि नैराश्याचे सावट पसरलेल्या संध्याकाळी हातात चहाचा कप घेऊन मी गच्चीत उभी होते. चहा प्यायची तीव्र इच्छा झाली होती. हातात कपही मिळाला होता काहीच अडथळा नव्हता. तरीही चहाचा एक घोटही प्यायले नव्हते मी.

घरात एकामागून एक घडणाऱ्या घटनांचे अर्थ लावण्यात, त्यामागची कारणं शोधण्यात मन गुंतून गेलेलं.

प्रत्येक मानवी मनाला सतावणारा प्रश्न

‘‘हे माझ्याच बाबतीत का?‘‘

या प्रश्नासोबत येतात अनेक उपप्रश्न.

का मी जन्माला आले? माझं अस्तित्व काय? पृथ्वीतलावर माझ्या येण्याचा उद्देश काय? आईवडिलांनी जन्म दिला, लहानाची मोठी झाले,शिक्षण घेतलं, रिवाजाप्रमाणे लग्न झालं, मुलं झाली . पण या जन्माचा अर्थ काय? मी कोणै? कोहम्?

आपल्या सर्व संतांनी या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी अनेक मार्ग दाखवले. तत्वज्ञांनी अनेक ईझम शोधून काढले याचसाठी. पण निष्कर्ष काय?



तर निष्कर्ष एवढाच की जगण्याचा अर्थ मरण आल्याशिवाय कळत नाही

विचार करता करता मन आणि शरीर थकलं, मेंदू शिणला, चहावर दाट साय आली.

जीवन म्हणजे नक्की कायै?

जीवन एक अनाकलनीय कोडंचै. क्षणात हसू आणि क्षणार्धात डोळ्यांमध्ये आसवांचा पूर.

एका आनंदी क्षणी वाटतं, हे आयुष्य म्हणजे फ ुलांनी सजलेलं शहरै . या फुलांच्या शहरात आपल्याला आपले जीवलग भेटतात , भरभरून आनंद देतात, सुरांच्या मैफिलीत, स्नेह्यांच्या सहवासात आपण जगाचं भान हरपून जातो. तरीही कुणाच्या येण्यानं अथवा अनुपस्थितीनं काही फरक पडत नाही , काहीच बदलत नाही.

पण... पण खरंच तसं काही असतं का?

कधी कधी आपलं सुप्त मन गाढ झोपेत असतं आणि आपण धावत असतो स्वप्नांच्या दुनियेत .



सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

ती स्वप्नंच आपला हात धरून आपल्याला ओढत असतात . मनावर अस्पष्ट अशी धुक्याची दुलई पसरलेली असते तरीही आपण न थकता धावतच असतो स्वप्नांच्या मागे.

स्वप्नांच्या दुनियेतले आपण प्रवासी कधी त्या स्वप्नांच्याही पलीकडे जातो आपलं आपल्यालाच कळत नाही.

स्वप्नांचे इमले रचणारे आपण, आशा–निराशेच्या हिंदोळ्यावर झुलत असतो आणि अचानक मौनाचा मुखवटा धारण करून अज्ञातांच्या प्रदेशात निघून जातो.

कसलेही पाश मागे न ठेवता, कुणाच्याही मोह–बंधनात न गुंतता, कुणाचाही निरोप न घेताच या अनाकलनीय आयुष्यातून रिक्त हाताने आपण कुठं बरं निघून जातो?

आयुष्यानं घातलेलं हे गूढ कोडंय. आपण याच कोड्याच्या उत्तराच्या शोधात तर कुठे....?

पण.. पण या कोड्याचं उत्तर मिळालंच तर?


या कोड्याचं उत्तर मिळताक्षणी हा खेळच सारा संपून जाईल ना?

म्हणूनच या प्रश्नांना उत्तरं नकोच असतात.
त्यांना फक्त हवी असते साथ....
क्षणांची, स्मृतींची आणि
आणि संवादाची.

# खरा मित्र...

**ज्योतिर्मय साहित्य**

सखा म्हणलं की अगदी जिवाभावाचा मित्र. हल्ली मित्र कोण आहे असा जिवाभावाचा, मित्र तसं पाहिलं तर व्हर्च्युअल खूप. पण जिवाभावाचा मित्र म्हणाल तर बोटावर मोजण्या सारखे सुद्धा नसतात पण याला एक अपवाद आहे हा मोबाईल. दिवस सुरू होत नाही या मोबाईल शिवाय. सकाळी उठवायला सुद्धा तो कंटाळत नाही त्याला दिलेली वेळ तो बरोबर पाळतो. मी तर रेडिओ सुद्धा त्याच्यावरच लावते. सख्याला घेऊन स्वयंपाक घरात यायचं सुरक्षित ठिकाणी ठेवायचं त्याच्या तालावर चहाच अधण, डाळ–भाताचा कुकर असं पुढे चालू. सकाळच्या कामातून विसावा मिळाला की बघायचं कोणी काय पाठवले, कोणाचे काय रिप्लाय, कोणी काय नवीन पाठवलं त्या सगळ्यांना उत्तर द्यायची काम करायची. खरंच माझा सखा अजिबात थकत नाही. पण हळूहळू त्यालाही भूक लागते, शक्ती कमी व्हायला लागते मग म्हणतो मला अजुन शक्ती मिळाली तर मी अजिबात दमणार नाही. ओळखायचं काय करायचं ते. त्याचा त्याला खाद्य द्यायचं आणि पुढचे काम सुरू करायचे. ऑफिसची वेळ झाली की पर्स बघायची सख्याला घेतले ना आज बरोबर नाही तर सगळी पंचाईत व्हायची. त्याला बरोबर घेऊन ऑफिसला जायचं ऑफिसमध्ये गेलो की मेसेजेस, ईमेल



सगळ चेक करायच. माझा सख्या सगळं सेव्ह करून ठेवतो बर का. तुम्ही कधी ते बघता याचीच वाट बघत असतो. ऑफिसमध्ये याला जरा विश्रांती देते परत घरी आले की चहा घेता घेता कोणाचे काय मेसेजेस ते सगळ चेक करायच. कुणी काही लिंक दिली असतील छान वाटल्या आवडीच्या असल्या तर त्या बघाच्या. रात्रीच्या जेवणाला तर सगळेजण आप आपल्या सख्या बरोबर बसलेले असतात म्हणजे घरात माणसं तीन पण तशी गंमत आहे की नाही. भिशी कोणाला आहे ते बघायचं त्याचे पैसे गुगल पे नी ट्रान्सफर करून टाकायचे. आता हल्ली सारखं नाही राहिलं भिशीला गेलं नाही तर पैसे कधीतरी नेऊन द्यायचे. भिशीला जायच्या आधीच सगळ्यांचे पैसे आलेले असतात. ॲमेझॉन वर ऑनलाइन शॉपिंग करायचं. किती काम करून घ्यायची त्याच्याकडनं सगळ्या ग्रुप वर एकदा गुड नाईट करून झालं, किती दिवसाची कृतकृत्यता झाल्या सारख वाटत. रात्री झोपतानाही अलार्म लावला आहे का नाही हे बघायचं..

अधूनमधून फोटो, सेल्फी सार सुरू असत. व्हिडिओ सुद्धा करतो हा सख्या. किती रे छळतो आम्ही तुला .




✍ रोहिणी रवींद्र









# दवाखाना

## क्षयरोग- भाग ४


**ज्योतिर्मय साहित्य**

नमस्कार मैत्रांनो!

संसर्गजन्य क्षयरोगाचा प्रसार कसा होतो हे जाणून घेऊ या. एका क्षयरोगग्रस्त अर्थात टीबीने संक्रमित व्यक्तीपासून तो दुसऱ्या व्यक्ती/ व्यक्तींमध्ये पसरत जातो. असा संक्रमित रुग्ण जेव्हा खोकलतो, शिंकतो, बोलतो किंवा गातो तेव्हा टीबीचे जिवाणू त्याच्या द्वारे हवेतून फ ेकल्या गेलेल्या थुंकीतून किंवा नाकातील स्रावातून कैक तास हवेत रेंगाळत असतात. त्याच्या आसपास असलेल्या व्यक्ती श्वास घेतांना या जिवाणूंना आपल्या शरीरात सामावून घेतात. आता या संक्रमित व्यक्तींमध्ये जिवाणूंचे मार्गक्रमण समान नसते.

यासाठी आपण जाणून घेतले पाहिजेत ते क्षयरोग संसर्गाचे दोन महत्वाचे टप्पे!

सुप्त क्षयरोग संसर्ग (लेटेंट टीबी इंफेक्शन): हा प्रथम टप्पा म्हणजे वर नमूद केलेल्या कारणांमुळे ग्रसित रुग्णाच्या संपर्कात आल्यानंतरची अवस्था. इथे या दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात क्षयरोगाचे जिवाणू असले तरी ते निद्रिस्त असतात. त्यात टीबीची लक्षणे दिसत नाहीत आणि सर्वात महत्वाचा दिलासा म्हणजे अशा व्यक्तीपासून टीबीचा रोग होण्याची इतरांना भीती नसते. मात्र जोवर हा जिवाणू झोपलाय तोवरच ठीक! कांही व्यक्तींची रोगप्रतिकारशक्ती कमी असते, किंवा इतर रोगांमुळे कमी झालेली असते (इथे एकच नांव अतिमहत्त्वाचे, ते म्हणजे एड्स). अशा व्यक्तींमध्ये हा मायकोबॅक्टेरियम ट्यूबरक्युलोसिस नामक कुंभकर्ण सहजपणे जागा होतो अन आपले प्रताप दर्शविण्याचा कुमुहूर्त साधतो.




सक्रिय क्षयरोग संसर्ग अर्थात ॲक्टिव्ह टीबी रोग: आता हे जिवाणू कुणाचे ऐकायच्या मूड मध्ये नसतात (एकच अपवाद, त्यावरील प्रभावी प्रतिजैविके). त्यांना त्यांच्या जमातीचा गुणाकार कसा वाढता वाढता वाढेल याची घाई असते! तथापि, सामान्यतः काही मिनिटांत पुनरुत्पादन करणाऱ्या इतर जिवाणूंच्या तुलनेत, टीबीचे जिवाणू याच प्रक्रियेला १८-२४ तास लावतात. (मात्र त्यांच्याहून देखील आळशी जिवाणू आहेत मंडळी!) या टप्प्याची महत्वाची दोन अंगे म्हणजे रोग्यात विकसित झालेली टीबीची (अव) लक्षणे आणि इतरांना या रुग्णापासून असलेला संसर्गाचा धोका.

**सक्रिय टीबीची लक्षणे**

बहुतांश रुग्णात फुफ्फुसांचा क्षयरोग होत असल्याने सलग ३ आठवडे किंवा त्याहून अधिक काळ टिकणारा खोकला हे सक्रिय रोगाचे प्रमुख लक्षण असते. या जीवघेण्या खोकल्यातुन बाहेर पडणारा पिवळसर कफ आणि कधीकधी रक्त त्याच्या संपर्कात असलेल्यांसाठी विशेषतः कुटुंबियांसाठी अति घातक असते. रोग जसजसा वाढत असतो तसतसे हे प्रमाण वाढते. तीव्र खोकला अन दम लागल्यामुळे रोग्याला बसल्या जागी श्वासोच्छ्वास घेणे दुष्कर होते. नंतर ही प्रक्रिया देखील वेदनादायक होत जाते. फुफ्फुसे निकामी होत जातात आणि प्राणवायू शोषून घेण्याचे त्यांचे कार्य प्रभावित होते. रोग्याला क्षयरोग कुठलाही असो, खालील लक्षणे बहुदा आढळतात. अंगात बारीक ताप मुरतो आणि तो संध्याकाळी तो वर्धमान होत असतो. रोग्याला रात्री घाम येतो. कधी तर तो इतका अधिक येतो की अंग, कपडे आणि बिछाना ओला झाल्याने मध्यरात्री रुग्ण उठून बसतो. सततच्या तापाने भूक कमी लागते आणि खायची इच्छा मरते. साहजिकच वजन खूप कमी होते. भयंकर थकवा जाणवतो. सगळी शारीरिक ऊर्जा पिळून निघाल्यावर प्रतिकारशक्ती कशी टिकणार? रोग्याला दैनंदिन कार्य देखील झेपेनासे होते. असे हे दुष्टचक्र रोग्याच्या शरीराला अन मनालाही व्यापून उरतेच. म्हणूनच तो राजयक्ष्मा अर्थात रोगांचा राजा आहे!



**लेखिका**
**डॉक्टर मीना श्रीवास्तव**

वर निर्देशित कोणतीही लक्षणे दिसल्यास डॉक्टरांना अति शीघ्र भेटावे. यात क्षयरोगाचे निदान होऊन रोग्यावर सर्वंकष उपचार महत्वाचे आहेतच पण त्यासोबत त्या रोग्याद्वारे होणारा रोगाचा प्रसार रोखला जातो. हे जितक्या लवकर होईल तितका उपचाराचा प्रभाव परिणामकारक होऊन रुग्ण क्षयाच्या जाचक मगरमिठीतून मुक्त होऊ शकतो.

क्षयरोगाचे निदान: यासाठी सामान्यत: एकाहून अधिक चाचण्या कराव्या लागतात.

मॅनटॉक्स अथवा ट्यूबरक्युलिन स्किन टेस्ट अतिशय संवेदनशील आहे. यात कोपराच्या खालच्या त्वचेच्या आत अत्यल्प प्रमाणात टीबी प्रथिन टोचल्या जाते. ७२ तासांनी त्या भागाचे निरीक्षण केल्या जाते. टीबीचा संसर्ग असल्यास इंजेक्शनच्या ठिकाणी सूज अथवा टेंगूळ येते. आधी सर्वदूर प्रचलित असणारी ही चाचणी आता अगदी मोजक्या रुग्णांत केल्या जाते, कारण त्याहून अधिक प्रभावी आणि संवेदनशील चाचण्या आता उपलब्ध आहेत.

यविषयी अधिक माहिती पुढील भागात!

# रगडा पुरी..

**ज्योतिर्मय साहित्य**



अलीकडे ऋतुंची लहर कधी बदलेल सांगता येत नाही..अगदी परवा परवा पर्यंत आषाढ धारा कोसळत होत्या. हवेत गारवा भरून राहत असल्याने गरमागरम वेगवेगळे पदार्थ आणि छान कढत कॉफी पाऊस बघत खाताना एक वेगळाच आनंद मनात मुरत जात असे..

पण अलीकडे अचानकच सगळे आभाळ कोरडे झालेय हवेत उष्मा वाढला म्हणून काल संध्याकाळी सर्वांची आवडती रगडा पुरी करायची ठरविली.अशा हवेत खाण्याची मजा वेगळीच असते.


मुलग्याने उत्साहात सगळे सामान आणले. सुनबाईंनी खास पुदिन्याच्या चवीची हिरवीगार तिखट चटणी केली.मी चटकदार रगडा, गोड दही केले आणि चिंच खजुराची आंबटगोड चवीची चटणी केली..

छान कुरकुरीत थोड्याशा पोटात फोडलेल्या पुऱ्या,त्यामध्ये छान मिळून आलेला रगडा, हिरवी तिखट चटणी, गोड पांढरेशुभ्र दही, रंग संगती आणि चव वाढविणारी खजूर, चिंचेची चटणी आणि वरून बारीक चिरलेला कांदा, हिरवीगार कोथिंबीर आणि त्यावर पेरलेली कुरकुरीत बारीक शेव.. हे रगडा पुरीचे सजलेले रूप बघूनच रसना जागृत होते..

परत हेच सगळे पदार्थ थोड्याफार फरकाने वापरून शेव बटाटा पुरी,पाणी पुरी, चाट हे ही सगळे करता येते..जीभ आणि मन तृप्त करणारे हे पदार्थ कोणी शोधून काढले त्याचे मला मनापासून कौतुक वाटते..

**सुगरण**
**माधुरी इनामदार**


आपल्याही आयुष्यात बदल म्हणून अशा छोट्या भिशी पार्ट्या,मैत्री पार्ट्या,एकत्र जमल्यावर एखाद्या विषयावर सहज रंगलेल्या गप्पा.. कधी ठरवून आणलेल्या कधी अचानक जुळलेल्या अशा मैफिली जणू रगडा पुरी/ पाणी पुरी सारखीच रंगत जीवनात आणतात ना? या मध्येही वेगवेगळे गुणधर्म,चव असलेले पदार्थ आहेत पण त्यांचे एकत्रित आल्याने एक वेगळाच अफलातून पदार्थ बनतो.. तसेच भिन्न स्वभावांची माणसे असतात तरीही नक्कीच अधून मधून एकत्र यावे..अगदी या रगडा पुरीसारखे सारखे..त्यामुळे नक्कीच जीवनाची चव वाढेल.. आणि त्यातूनही चिंचेचा आंबटपणात खजूर,गुळ गोडवा आणते,मिरचीच्या चटणीत कोथिंबीर पुदिना गारवा आणि सौम्यपणा आणते,मिळून आलेला रगडा सगळ्यांना जोडून ठेवतो.कुरकुरीत पुऱ्या सगळ्या चवींना सामावून घेतो..तसेच आपणही जिथे कमी तिथे मी म्हणायचे.. आणि आपल्यातल्या कमीला सांभाळून घेऊन हमी देणारे ही आपल्या जीवनप्रवासात असतात ही श्रद्धा आणि विश्वास ठेवायचा. पणीपुरी कशी खाल्लयाक्षणी आपल्या तोंडातून आनंदाने आहाहा येते..तसे आपल्याला भेटल्यावर आपल्याशी बोलल्यावर समोरच्या चेहऱ्यावर आनंदी भाव यायला हवेत... हे पटतंय का तुम्हांलाही..?






























हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559